**प्रेस नोट** दिनांक ३०/०४/२०१९

## ठाणे मध्यवर्ती कारागृह येथील शिपायास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | **ठाणे** |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | ठाणेनगर पो.स्टे. ठाणे शहर गु.र.नं. II २८/२०१३, ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७,१३(१) (ड) सह १३(२) |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे (मुख्यालय सीआर/११९/ठाणे/२०१३) |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **श्री.संतोष पांडुरंग पवार, शिपाई, मध्यवर्ती कारागृह, ठाणे** (वय ४३वर्षे) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | **५,०००/— रुपये** |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **५,०००/— रुपये** |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या ठाणे मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेल्या मुलास विशेष सुविधा देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५,०००/— रुपयांची लाच स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडुन, त्यांच्याविरुध्द ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे दिनांक ०६/०३/२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. सत्र न्यायालय—४ ठाणे येथे नमुद आरोपी यांचेविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी मा. न्यायाधीश श्री. पी. पी. जाधव, सत्र न्यायालय—४ ठाणे येथे झाली असता सुनावणीअंती नमुद आरोपीविरुध्द् सबळ पुराव्यानिशी आरोप सिद्ध झाल्याने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**शिक्षा — भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे**<br>१) कलम ७ प्रमाणे ३ वर्ष सक्त मजुरी कारावास व २५,००० रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास.<br>२) कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ४ वर्ष सक्त मजुरी कारावास व २५,००० रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास<br>सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. अरूणकुमार सपकाळ, ला.प्र.वि, ठाणे यांनी केला असुन, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्री. विवेक कडु यांनी काम पाहिले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्‌ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :— **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :— acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई—मेल :— spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री नं :— १०६४
दुरध्वनी क्र. :— ०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् ॲप क्र. :— ९९३०९९७७००


पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे (शिक्का)

**( डॉ. महेश पाटील )**
**पोलीस अधीक्षक,**
**अँन्टी करप्शन ब्युरो,**
**ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

Scanned by CamScanner